पोलीस आयुक्त, नवी मुंबई आणि विशेष पोलीस महानिरिक्षक,कोकण परिक्षेत्र,नवी मुंबई यांचे आस्थापनेवरील विधी अधिकारी 'गट अ' यांची खालील पदे कंत्राटी पध्दतीने नियुक्तीसाठी विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

---

जाहिरात क्र. पोआ/नमुं/आस्था १/वि.अ.गट–अ/भरती/०२/२०१८ नवी मुंबई दि. ०४/०७/२०१८

पोलीस आयुक्त, नवी मुंबई आणि विशेष पोलीस महानिरिक्षक, कोकण परिक्षेत्र,नवी मुंबई यांच्या आस्थापनेवरील खाली दर्शविलेल्या ठिकाणी विधी अधिकारी 'गट–अ 'यांची पदे पुर्णत: ११ महिने कंत्राटी पध्दतीने भरावयाची आहेत.

**विधी अधिकारी 'गट–अ ' (एकुण ०२ पदे )**

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | मंजूर पदे |
|---|---|---|
| १ | पोलीस आयुक्त नवी मुंबई | ०१ |
| २ | विशेष पोलीस महानिरिक्षक,कोकण परिक्षेत्र,नवी मुंबई | ०१ |
| | एकुण | ०२ |

उमेदवाराने सोबत दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज लिफाफ्यात घालून लिफाफ्यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात विधी अधिकारी 'गट–अ ' च्या पदासाठी अर्ज असे नमुद करुन दि. २०/०७/२०१८ पर्यत पोलीस आयुक्त, नवी मुंबई, सेक्टर नं.१० आर.बी.आय.बॅंकेचे समोर,सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ ( लक्षवेध :– प्रमुख लिपीक आस्थापना शाखा–०१ ) या पत्त्यावर पोहचेल याची दक्षता घ्यावी. **दिनांक:२०/०७/२०१८ नंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यांत येणार नाही.** अर्जासोबत पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे जोडावेत.

त्या संबंधीची सविस्तर माहिती जाहीरात व अर्ज करण्याबाबतची सविस्तर माहिती www.navimumbaipolice.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत आलेली आहे.

(प्रकाश जाधव)
प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त नवी मुंबई करीता

# — : जाहिरात :—

जाहिरात क्रमांक. :. ०२/२०१८ पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई दिनांक :— ०४/०७/२०१८

महाराष्ट्र शासन निर्णय गृह विभाग क्र.अेपीओ—३१०६/प्र.क्र.२२७/पोल—३, दिनांक.२१/०८/२००६ व शासन गृह विभाग क्र.एसपीपी २००५/प्रक्र.२४७/पोल—१०, दि.१५/०९/२००६ अन्वये पोलीसांकडुन दाखल होणारे खटले विधीवत दाखल व्हावेत, त्यासाठी त्यांना योग्य ते वैधानिक सहाय्य मिळावे व गुन्हेगारांना शासन होवुन कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम व्हावी. तसेच पोलीस प्रशिक्षण संस्थामध्ये पोलीसांना कायदेविषयक प्रशिक्षण देणे सुलभ व्हावे म्हणुन पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या आस्थापनेवर विधीविषयक अधिका—यांची पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. त्यापैकी **पोलीस आयुक्त,नवी मुंबई** आणि **विशेष पोलीस महानिरिक्षक,कोकण परिक्षेत्र,नवी मुंबई** यांच्या आस्थापनेवर विधी अधिकारी 'गट —अ' ची कंत्राटी प्रत्येकी ०१ पद मंजुर करण्यात आलेले आहेत. सदरची पदे शासन निर्णय क्र.एसपीपी २००५/प्र.क्र.२४७/पोल—१० दि.१५/०९/२००६ मध्ये नमुद झालेल्या कार्यपध्दतीनुसार भरण्याकरीता पोलीस आयुक्त नवी मुंबई यांची " निवड मंडळाचे अध्यक्ष " म्हणून पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्र.पोमसं/ २—अ/ ३२२८/वि.अ.भरती/२०१५ दि.२३/०२/२०१८ नुसार मान्यता दिलेली आहे.

तरी **पोलीस आयुक्त नवी मुंबई** आणि **विशेष पोलीस महानिरिक्षक, कोकण परिक्षेत्र,नवी मुंबई** येथील विधी अधिकारी गट—अ ची कंत्राटी पदे भरावयाची असल्याने, खालील अटी व शर्ती पुर्ण करण्या—या उमेदवारांनी सदर पदांकरीता जाहिरातीत दिलेल्या नमुना फॉर्ममध्ये विनंती अर्ज दिनांक २०/०७/२०१८, रोजी पर्यत नवी मुंबई पोलीस आयुक्त कार्यालय ,सीबीडी बेलापुर, सेक्टर १०, नवी मुंबई येथे पोहचेल अशा बेताने पाठवावेत. तद्नंतर प्राप्त झालेले विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

निवड मंडळाने शिफारस केलेल्या नावांची यादी नियुक्ती प्राधिकारी यांचे मान्यतेकरीता पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे कार्यालयात सादर करण्यांत येणार आहे.

➢ करारातील मासिक देय रक्कम.

अ) विधी अधिकारी गट अ या पदाकरीता एकत्रीत अनुज्ञेय मासीक देय रक्म रूपये २०,०००/— आणि दुरध्वनी व प्रवास खर्चाकरीता रूपये ५०००/— असे एकुण २५,०००/— दरमहा देय राहील.( उपरनिर्देष्ठ मर्यादेपेक्षा ) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

➢ शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा अनुभव .

१) शेक्षणिक अर्हता :—१)उमेदवार मान्यताप्राप्त विदयापिठाचा कायदयाचा पदवीधर असेल व तो सनदधारक असेल.

२) **वयोमर्यादा** :— विधी अधिकारी गट 'अ या पदाकरीता उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी दिनांक ३०/०६/२०१८ रोजी ६२ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३) जी व्यक्ती शासकीय सेवेत असताना प्रत्यक्षपणे विधी विषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस

गुन्हेगारी प्रशासकीय व सेवाविषयक कायदयाविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा.सर्वाच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायदयाचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागु राहतील. शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

४) **अनुभव** :—

**अ)** विधी अधिकारी 'गट अ या पदांसाठी वकील व्यवसायाचा किमान ०७ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

**ब)** उमेदवार गुन्हेगारी विषय, सेवाविषयक्क प्रशासनीक अशा सर्व प्रकारच्या कायदयाची स्थिती तथा विभागीय चौकशी त्यादी बाबतीत ज्ञान संपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडु शकेल.

**क)** उमेदवारांस मराठी, हिंदी, व इंग्रजी भाषेचे पुरेस ज्ञान असणे आवश्यक आहे.

➤ **कर्तव्य व जबाबदा—या**

१) कार्यालयाकडे प्राप्त होणा—या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबीबाबत/ न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकारणे हाताळणे.

२) सेवाविषयक/प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशी तथा समकालीन कायदयाची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलांकडे पाठपुरावा करणे जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्रे संबधीत अधिका—याच्या मदतीने तयार करणे.

४) शपथपत्र मसुदा तयार करणे व त्यास समक्ष प्राधिका—याची मान्याता घेवुन न्यायालय विहीत मुदतीत सादर होईल हे पाहणे.

५) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे. अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून तदनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करून तो संबधीत सरकारी वकिलाकडे पाठविणे व अपीलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

७) विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमुन दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

८) पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

९) केंद्र शासन/ राज्य शासन, पोलीसां विरोधात दाखल सर्व अपिल प्रकरणांत मदत करणे

१०) मा. सर्वोच्च न्यायालय / मा.उच्च न्यायालय मधील सर्व प्रकरणात मदत करणे

११) मा. सत्र न्यायालय / प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी / सेशन कोर्ट मधील सर्व प्रकरणात मदत करणे

१२) राज्य महिला आयोग / राष्ट्रीय महिला आयोगाकडील पोलीस प्रकरणात मदत करणे

१३) राज्य मानवी आयोग / राष्ट्रीय मानवी आयोगाकडील प्रकरणात मदत करणे

१४) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट) येथील पोलीस प्रशासनाविरोधातील प्रकरणात मुददेनिहाय अहवाल तयार करणे.

१५) अल्पसंख्याक आयोग / माहिती आयुक्त यांचेकडील तसेच अनुसूचित जाती / जमाती आयोगाकडे असलेल्या कोर्ट प्रकरणात मदत करणे

१६) उपरोक्त नमुद प्रकरणासह इतर सर्व राज्य घटनानिर्मित प्रकरणात तसेच पोलीस तक्रार प्राधिकरणाकडील प्रकरणात व वेळोवेळी आलेली सर्व प्रकारच्या न्यायालयीन प्रकरणात मदत करणे

➤ **अटी व शर्ती**

१) सदर पदाची नेमणुक ही पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. उमेदवाराला शशासकीय कर्मचारी/अधिकारी म्हणुन गणले जाणार नाही.

२) सदर नेमणुका हया करार पध्दतीने ११ महिन्यासाठी करण्यात येतील. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी ( जास्तीत जास्त ३ वेळा ११ महिन्याकरिता ) वाढविता येईल. ३ वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही अशा उमेदवाराची पुन:श्च नियुक्ती करणे आवश्यक आहे. असे सक्षम प्राधीका—याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुन:श्च निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

३) निवड केलेले उमेदवार ११ महिन्याच्या कराराच्या कालावधीत वकीली व्यवसायांशी संबधीत कोणत्याही प्रकारचे खाजगी काम / व्यवसाय नियुक्ती प्राधीकरणाच्या लेखी परवानागीशिवाय करू शशकणार नाही. जर नियुक्ती प्राधीका—याने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरू ठेवला असेल व तसे करण्याने शशासनाच्या कामात

व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यास येईल.अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

४) उमेदवाराची निवड लेखी परिक्षेद्वारे तसेच मुलाखतीव्दारे करण्यात येईल.परिक्षेचा तसाच मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर कळविण्यात येईल.

५) उमेदवाराला कोणताही प्रवास खर्च देण्यात येणार नाही.

६) नियुक्त केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा (Agreement ) भरणे अनिवार्य राहील.

७) करार पध्दतीने नेमणुक करण्यात येणा—या अधिकारी / कर्मचा—याना एकत्रीत वेतन आणि अनुज्ञेय व दुरध्वनी व प्रवास खर्चाकरीता ( उपरनिर्देष्ठ मर्यादेपेक्षा ) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

८) उमेदवाराने वर विहीत केलेल्या शशैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी दिनांक ३०/०६/२०१८ अखेर पर्यत पुर्ण करणे आवश्यक आहे.

९) अर्जासोबत २.५ + २.५ सेमी आकाराचे सध्यांचे काढलेले २ रंगीत फोटो जोडावेत. तसेच पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे जोडावेत. पोष्टाचे तिकीटासह

१०) सदर पदाकरीता निवड होणा—या उमेदवारास कायदेविषयक सल्ला देण्यासाठी एक आठवडयात कमीत कमी ३० तासाचा कालावधी देणे बंधनकारक राहील.

(प्रकाश जाधव )
प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त नवी मुंबई करिता

# पोलीस आयुक्त, नवी मुंबई आणि विशेष पोलीस महानिरिक्षक,कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई येथील विधी अधिकारी 'गट अ' पदाचे अर्जाचा नमुना

विधी अधिकारी 'गट अ' पदाकरिता अर्ज

नियुक्तीचे इच्छुक ठिकाण :—

__________________________________________________

| कार्यालयीन उपयोगासाठी | |
|---|---|
| १) अर्ज क्रमांक :— | |
| २)अर्ज स्विकारल्याचा दिनांक :— | |
| ३) अर्ज स्विकारणा—याची स्वाक्षरी ( दिनांकासह ):— | |

एक फोटोवर स्वाक्षरी करून या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करून अर्जासोबत लिफाफ्यात जोडावा.

सुचना : अर्जदाराने अर्जातील अंक इंग्रजीत लिहावेत.
//अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी. आवश्यक नसेल तेथे खोडावे.

## अ ) अर्जदाराची वैयक्तीक माहिती

१) अर्जदाराचे पुर्ण नाव : आडनाव नाव वडिलांचे/पतीचे नाव

मराठीत :—

इंग्रजीत :—

२) पत्रव्यवहाराचा पत्ता :

तालुका जिल्हा पिनकोड

३)कायमचा पत्ता : तालुका जिल्हा पिनकोड

४) दुरध्वनी क्रमांक:लॅन्डलाईन ________________ मोबाईल क्र. ________________

ईमेल :— ________________________________

५) जन्मदिनांक : जन्मस्थळ—

दिवस महिना वर्ष

६) दिनांक ३०/०६/२०१८ रोजीचे वय :

दिवस महिना वर्ष

७) लिंग : पुरूष / महिला

८) धर्म : जात:

९) महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी आहात का ? : होय / नाही

## ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती

१०) शैक्षणिक अर्हता :

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव (विदयालय/ महाविदयालय). | बोर्ड/ विदयापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. माध्यामिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा ( इ. १० वी ) अथवा जुनी ११ वी परिक्षा | | | | | |
| २. उच्च माध्यमिक शशालांत प्रमाणपत्र परिक्षा ( इ. १२ वी.) | | | | | |
| ३. पदवी | | | | | |
| ४. विधी पदवी | | | | | |

११) इतर शैक्षणिक अर्हता :

संगणक प्रशिक्षीत आहे काय ? होय /नाही.

१२) अर्जदाराची इतर माहिती.

अ) सनद घेतल्याचा दिनांक.:— ____________________

ब ) उमेदवाराने स्वत: हाताळलेल्या केसेसचा तपशील.

| अ.क्र. | न्यायालयाचे नावे | केसेसचा प्रकार | केसेसच्या संख्या |
|---|---|---|---|
| | | | |

टिप :– वकिली व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१३– अ) अर्जदारावर यापुर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात /स्थानबध्द करण्यात /बध्द करण्यात

/दंड करण्यात /सिध्दोषी ठरवण्यात आले आहे काय ?,किंवा लोकसेवा आयोगाकडुन त्यांच्या परिक्षांना /निवडीना बसण्यास मनाई करण्यात आले आहे काय ?, किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय ?, किंवा कोणत्याही विद्यापीठाकडुन किवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडुन /संस्थेकडुन कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय ? काढुन टाकण्यात आले आहे काय ? होय / नाही.

१३– ब) हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात/संस्थेत उमेदवाराविरूध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय ? होय / नाही

( १३ –अ किवा १३–ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरताना सदर खटला, अटक, स्थानबध्दती ,दंड, दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यादीचा संपुर्ण तपशील आणि न्यायालय/विदयापीठ/शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरूप स्पष्ट करावे.)

ठिकाण :–

दिनांक :–

अर्जदाराची सही.

( दिनांकासह )

# अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी श्री./सौ./कु.

---------------------------------------------------------------- याव्दारे प्रतिज्ञापुर्वक अर्ज जाहीर करतो/करते की, वरिल माहिती जाणीवपुर्वक तसेच विश्वासपुर्वक दिली असुन ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमुद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळुन लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :–

दिनांक :– अर्जदाराची सही.

( दिनांकासह )

सोबत :– अर्जाद नमुद केलेल्या बाबीच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणीत केलेल्या छायांकीत प्रती.